## प्रकरण : तिसरे

# संशोधन कार्यपध्दती

---


३.१ प्रस्तावना

३.२ संशोधन प्रश्न आणि समस्या सुत्रण

३.३  संशोधन विषयाचे महत्त्व

३.४ संशोधन विषयातील परिभाषिक संज्ञा

३.५ संशोधनाचे क्षेत्र

३.६ संशोधनाची उदिष्टये

३.७ संशोधनाची गृहितके

३.८ संशोधनाची पध्दती

३.९  नमुना निवड

३.१० तथ्य संकलनाची साधने

३.११ चल व उपचल पदे

३.१२ तथ्य विश्लेषण व तथ्य प्रक्रियन

३.१३ संशोधन अध्ययनाची व्याप्ती

३.१४ संशोधनाच्या मर्यादा

३.१५ प्रकरणांची योजना


## ३.१ प्रस्तावना

भारतीय राज्यघटनेच्या कलम २१ नुसार प्रत्येक व्यक्तीला जिवीताचा अधिकार दिलेला आहे. प्रत्येक व्यक्तीला जगण्यासाठी पोषक परिस्थिती निर्माण करण्याचे काम शासनाचे आहे, अन्नसुरक्षा विधेयकानुसार आणि भारतीय राज्यघटनेच्या कलम २१ नुसार प्रत्येक व्यक्तीला अन्नाचा अधिकार मिळालेला आहे. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे झाली तरच या योजनेचा खरा हेतू सफल होणार आहे. त्यामुळे सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेचे वस्तुनिष्ट चिकित्सा होणे आवश्यक आहे.

ग्रामीण भागातील सार्वजनिक स्वस्तधान्य दुकानांसमोर लाभार्थींची भलीमोठी रांग असते, अनेक लाभार्थ्यांना त्यांच्या वाटणीचे धान्य मिळत नाही, कोणत्याही धान्य वाटप दुकानदारांची धान्य वाटपाची वेळ ठरलेली नसते ते त्यांना वाटेल तेव्हा दुकान उघडतात व बंद करतात, अनेक निरक्षर लाभार्थ्यांना धान्याचा कोटा कमी मिळतो, काही वेळेला धान्य शिल्लक असूनही धान्य संपले असे धान्य दुकानदार सांगतात अशा अनेक समस्यांग्रस्त ही योजना ठरलेली आहे. सार्वजनिक वितरण योजनेतील गैरव्यवहाराशी संबंधित अनेक बातम्या प्रसिध्दी माध्यमातून प्रसिध्द होताना आढळतात. सार्वजनिक वितरण योजनेत जर गैरव्यवहार होत असल्यामुळे सामान्य लाभार्थी लाभापासून वंचित राहत आहेत.

सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना सर्वसामान्य जनतेसाठी महत्त्वाची योजना आहे. प्रशासकिय अधिकारी, राजकारणी लोक, सर्वसामान्य लाभार्थ्यांचा संबंध योजनेच्या अंमलबजावणीत असतो. प्रस्तूत संशोधन विषयाचा चिकित्सक अभ्यास करताना या योजनेतील सर्वच सहभागी घटकांच्या संबंधाचा आढावा घेण्यात आला आहे. सर्व लोकांचा समान विकास करण्यासाठी दुर्बल घटकांना विकासाची संधी देण्याचा प्रयत्न शासनाचा असतो. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना ही दुर्बल घटकांसाठी महत्त्वाची आहे.

सार्वजनिक वितरण योजनेच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना भारत शासनाने अन्नाचा अधिकार प्रदान केला आहे. शासनाने सर्व गरीब लोकांना अन्न उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे. सामान्य नागरिकांना सार्वजनिक वितरण योजनेतील अन्नाधान्याचा लाभ होतो किंवा नाही याबाबतचा चिकित्सक अभ्यास करुन अडचणींचा शोध घेवून त्यावर उपाय सुचवण्यात आले आहेत. या शिफारशींचा फायदा समाजाला सामान्य नागरिकांना होणार आहे. संशोधनातून होणाऱ्या निष्पत्तींमधून सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी मदत होणार आहे.

**३.२ संशोधन प्रश्न आणि समस्या सुत्रण :** सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेचा अभ्यास करताना पुणे जिल्ह्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेचा चिकित्सक अभ्यास विशेष संदर्भः बारामती व इंदापूर तालुका हा विषय संशोधनासाठी घेतला आहे. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना ग्रामीण भागात महत्त्वाची आहे. रेशन धान्य दुकानदारांच्या मार्फत धान्याचे वितरण करण्यात येते. रेशनधान्य दुकानदार हा या योजनेतील महत्त्वाचा घटक आहे. रेशन धान्याचे वाटप करताना दुकानाबाहेर सतत रांगा असतात. रेशनधान्य दुकान ठराविक काळातच उघडे किंवा चालू असते बहुतेक वेळी हे दुकान बंदच असते. धान्य वाटपाचे वेळापत्रक नसते, लाभार्थ्यांचे आधारकार्ड ऑनलाईन जोडलेले नसेल तर धान्य मिळत नाही.

अन्न–धान्य वितरणासाठी नव्याने सुरू केलेली बायोमेट्रिक पध्दती राबविताना अनेक अडचणी येत आहेत, दुसरीकडे गावातील स्थानिक पुढारी व पदाधिकारी रेशनधान्य वाटपात हस्तक्षेप करतात. रेशन दुकानातून वितरीत केला जात असलेल्या धान्याचा दर्जा चांगला नसतो तसेच दुकानातून सर्व प्रकारच्या धान्याचा पुरवठा केला जात नाही सतत धान्य संपले, धान्य आलेच नाही अशी उडवाउडवीची उत्तरे दिली जातात. तिसरीकडे अत्यल्प मोबदला मिळत असल्यामुळे धान्य वितरीत करणारे स्वस्तधान्य दुकानदार समाधानी नाहीत. पुरेसा नफा मिळत नसल्यामुळे धान्याचा काळाबाजार व तत्सम मार्गाने उत्पन्न मिळविण्याचे प्रयत्न करताना दिसतात. तसेच धान्य वितरणातबाबत लाभार्थ्यांच्या तक्रारी ऐकूण घेण्याची व त्या सोडविण्याची सक्षम यंत्रणा नाही.

पुरवठा आधिकारी व तत्सम प्रशासकिय यंत्रणेकडून लोकांचा अपेक्षा भंग होतो. अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून कामात टाळाटाळ केली जाते. दप्तर दिरंगाई व लालफितीचा वारंवार अनुभव येतो. म्हणजेच अन्नसुरक्षा विधेयकाची योग्यप्रकारे कार्यवाही होत नाही. दक्षता समित्यांची स्थापना केली असली तरी त्यांची व दुकानदारांची हातमिळवणी झाल्यामुळे त्यांच्यावर उचीत कार्यवाही होत नाही. यासारख्या अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधन विषयातून केला आहे. या पार्श्वभुमीवर सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील समस्यांचा आढावा घेवून त्या समस्यांच्या निराकरणासाठी उपयुक्त सुचना करण्यापुर्वी प्रस्तूत अभ्यासाच्या अर्थपूर्ण मांडणीसाठी पुढील संशोधन प्रश्न निश्चित केले आहेत.

१. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना गरीब व दुर्बल घटकांची अन्न–धान्याची गरज भागवण्यासाठी पुरेशी आहे का?

३. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना दप्तर दिरंगाई ,व लालफितीच्या कारभाराने प्रभावित झाली आहे का?

४. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना स्वस्तधान्य दुकानदारांच्या मनमानी कारभार आणि अपारदर्शक कार्यपद्धतीमुळे अपयशी ठरली आहे का?

५. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेच्या अंमलबजावणीच्या सुसूत्रीकरणात आणि नियंत्रण ठेवणाऱ्या यंत्रणेचे (लोक प्रतिनिधी, दक्षता समिती, महिला बचत गट) राजकीयकरण झाले आहे का?

अशाप्रकारे अनेक प्रश्नांच्या जाळ्यात अडकलेल्या सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेला लोकाभिमुख करण्यासाठी वरील संशोधन प्रश्नांची उत्तरे शोधणे आवश्यक आहे जी प्रस्तुत अभ्यासाच्या माध्यमातून शोधली आहेत.

## ३.३ संशोधन विषयाचे महत्त्व

दारिद्र्य निर्मूलनाच्या कार्यक्रमामध्ये सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेला महत्त्वाचे स्थान आहे. दारिद्र्य निर्मूलनाचा अजेंडा २०३० च्या केंद्रस्थानी आहे.[१] शाश्वत विकासाची ध्येय साध्य करण्यासाठी सहायभूत ठरणारी सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण व्यवस्था ही एक प्रभावी यंत्रणा आहे. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेचे महत्त्वाचे दोन भाग आहेत. केंद्र सरकार व राज्य सरकार. वस्तूंची खरेदी, साठवणूक, व घाऊक वितरणाची जबाबदारी ही केंद्र शासनाची आहे तर दारिद्र्यरेषेखालील कुटुंबे निश्चित करणे, शिधापत्रिका वाटप करणे, रास्तभाव दुकानदारांमार्फत लाभार्थी कुटुंबांना वस्तूंचे वितरण करणे आणि रास्त भाव दुकानांच्या कार्यप्रणालीवर देखरेख व संनियंत्रण करणे ही कामे राज्य सरकारची आहेत. या कार्यप्रणालीत केंद्राची धोरणे व राज्याची धोरणे ही फार महत्त्वाची आहेत. धान्य खरेदी पासून धान्याचे वाटप शेवटच्या स्तरापर्यंत करण्यासाठी अनेक प्रक्रियेत या योजनेला कार्य करावे लागते. प्रशासन, लाभार्थी व राजकारणी या महत्त्वाच्या घटकांचा समावेश यामध्ये असतो.

ज्या लोकांना खुल्या बाजारातून अन्न–धान्य खरेदी करता येत नाही तसेच भूमिहीन, दारिद्र्यरेषेखालील जनता यांना अन्न–धान्य घेण्याइतकी त्यांची आर्थिक परिस्थिती नसते अशा लोकांसाठी सार्वजनिक वितरण प्रणाली आवश्यक आहे. तांदूळ, गहू, भरडधान्य, तेल, साखर इ. जीवन आवश्यक वस्तू सार्वजनिक वितरण योजनेतून वितरीत होत असल्यामुळे त्या वस्तूंचे वितरण योग्यप्रकारे होणे आवश्यक आहे. सामान्य लाभार्थ्यांना खरोखरच लाभाची प्राप्ती होते का ते तपासण्यासाठी प्रस्तूत संशोधन विषय महत्त्वाचा आहे.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ नुसार राज्यातील ६२.३% म्हणजे सात कोटी लोकसंख्या अनुदानित दराने धान्य मिळविण्यास पात्र आहे.[२] अन्न सुरक्षेची ही मोठी झेप आहे. ग्रामीण भागातील जनतेचा उदरनिर्वाह भागवण्यासाठी ही यंत्रणा खूप मोठी आहे त्यामुळे या योजनेचा अभ्यास केला आहे.

सार्वजनिक वितरण योजनेतील अंन्त्योदय, अन्नपूर्णा, दारिद्र्यरेषेखालील लाभार्थी फारच गरीब आहेत. महाराष्ट्रातील या लाभार्थ्यांची संख्या जवळपास २ दशलक्ष आहे. भूमिहीन, अपंग, वृध्द, लोकांचा समावेश या योजनांमध्ये आहे. सार्वजनिक वितरण योजनतील वितरीत होणाऱ्या धान्यामुळेच या गरीब लोकांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटला आहे. २०११ ते २०१४ या दरम्यानच्या कालखंडात ६० मे.टन तांदळाचे वितरण सामान्य लोकांसाठी केले आहे.[३] एवढया मोठया प्रमाणात शासन सार्वजनिक वितरण योजनेवर खर्च करत आहे. सार्वजनिक वितरण योजनेचा लाभार्थी हा सामान्य गरीब लाभार्थी आहे. त्यामुळे सार्वजनिक वितरण योजनेतील धान्य वितरणाचा चिकित्सक अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

अन्न–धान्य सवलतीच्या दरात गरीब लोकांना उपलब्ध झाल्याने गरीब लोकांना न्याय मिळणार आहे. त्यामुळे अन्न–धान्य मिळालेले लाभार्थी खरोखरच समाधानी आहे का? ते या संशोधन विषयातून पहायला मिळाले आहे. भारताची पिढी बलवान आणि कुपोषणमुक्त बनवायची असेल तर सर्व भारतीय लोकांना योग्य पध्दतीचा आहार मिळायला पाहिजे. ज्यांच्याजवळ पुरेसा पैसा आहे त्यांच्यासाठी जीवन जगणे सहज शक्य आहे. पण दारिद्र्यरेषेखालील व हालाखीचे जीवन जगणाऱ्यांसाठी सार्वजनिक वितरण प्रणालीतून मिळणारे धान्य खूप आधाराचे वाटते.

प्रत्यक्षात लाभार्थ्याची निवड करताना योग्य पध्दतीने पात्र व्यक्तीची निवड होत नाही. अनेक श्रीमंत लोक दारिद्र्यरेषेखालील यादीत आहेत व गरीब लोक ज्यंना खऱ्या अर्थाने रेशनिंगच्या धान्याची व तत्सम

सवलतीची गरज आहे त्यांना दारिद्र्यरेषेखालील यादीतून वगळण्यात आले आहे. असा हा अन्याय अनेक लोकांवर झाला आहे. त्यामुळे सार्वजनिक वितरण प्रणाली व तत्सम सरकारी यंत्रणा निपक्षपातीपणे कार्य करते का? हा महत्वाचा आणि कळेचा मुद्दा आहे. भूमिहीन कुटुंब, किमान जमीन धारक कुटुंबे, कच्च्या घरांमध्ये राहणारी कुटुंबे, अपंग कुटुंब प्रमुख असणारी कुटुंबे, मोटार वाहन नसलेली कुटुंबे असे वर्गीकरण असलेल्या कुटुबांची योग्यपध्दतीने विभागणी होणे आवश्यक आहे. नागरिकांचे सर्वेक्षण करताना व्यक्तीनिष्ठता न पहाता वस्तूनिष्ठ पध्दतीने सर्वेक्षण व्हायला पाहिजे. सार्वजनिक वितरण योजनेत काम करत असणाऱ्या लोकांच्या मुलाखती घेतल्यामुळे त्यांचा या यंत्रणेबाबतचा दृष्टिकोन लक्षात आला आहे.

सामाजिक संशोधनामध्ये ग्रामीण समुद्याचे अध्ययन करताना लोकांची गरीबी, आरोग्य, भौतिक परिस्थिती, सामाजिक प्रक्रिया, मानव व्यवहार, राजकारण्यांची धोरणे या घटकांना महत्त्वाचे स्थान असते. अनुसूचीच्या माध्यमातून सामान्य लाभार्थ्यांच्या अडचणी, रेशन धान्य दुकानदारांच्या अडचणी समजावून घेतल्या. धान्य गोदाम सांभाळणारे सेवा निवृत्त कर्मचारी, सार्वजनिक स्वस्तधान्य मिळवणारे काही जुने लाभार्थी, सामाजिक कार्यकर्ते, राजकारणी लोक, नवीन लाभार्थी, स्वस्तधान्य दुकानदार, बचत गटातील महिला, दारिद्र्यरेषेखालील लोक, योजनेत सहभागी नसलेले लोक, सार्वजनिक वितरण योजनेशी संबंधित कर्मचारी व अधिकारी, प्रशासकिय घटक, यांच्याशी प्राथमिक चर्चा करुन या योजनेच्या कार्यवाहीचे स्वरुप जाणून घेवून तथ्यांचे संकलन केले. संशोधनाचे क्षेत्र निवडताना सर्वात जास्त दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्या, ग्रामीण भागातील लोकसंख्येचा प्रदेश या घटकांचा विचार केला आहे.

ग्रामीण भागात सार्वजनिक वितरण योजनेतील लाभार्थ्यांच्या या योजनेबाबत तक्रारी आहेत. उदा. धान्य वेळेत न येणे, सर्व लाभार्थ्यांना धान्य न मिळणे, स्वस्तधान्य दुकान बंद असणे, कमी धान्य मिळणे, रॉकेल न मिळणे, धान्य खराब असणे. अनेकवेळा या तक्रारी प्रसारमाध्यमातून व्यक्त होतात. धान्य वितरणात अनियमितता का होतो? सार्वजनिक वितरण योजनेबाबत लाभार्थी तक्रारी का करतात? या बाबींची कारणे शोधून प्रस्तूत संशोधन विषयाच्या माध्यमातून पारदर्शक सार्वजनिक वितरण प्रणालीसाठी शिफारशी सुचवल्या आहेत. धान्याचा साठा करण्याचे ठिकाण, त्या ठिकाणी धान्याची काळजी कशी घेतली जाते तसेच शेतीमाल वेळेत उपलब्ध होतो का? धान्याची टंचाई का निर्माण होते? या सर्व बाबींचा या

संशोधन विषयातून अभ्यास केला आहे. सार्वजनिक वितरण योजनेचा गरीब लोकांच्या जीवनाशी संबंध असल्यामुळे या योजनेचा अभ्यासाला महत्त्व आहे.

स्थानिक पातळीवर अनेक लाभार्थी गरीब आणि निरक्षर असतात त्यांना न्याय पध्दतीने धान्याचे वाटप होत नाही असे काही लोकांचे म्हणणे असते. उलट धान्याची वाटप केली असा रेशन दुकानदारांचा दावा असतो. काही ठिकाणी या योजनेत बोगस लाभार्थी असतात तसेच स्थलांतरित कुटुंबे असतात तसेच मयत व्यक्तींच्या नावावरही धान्य घेतले जाते अशा गैरप्रकारांबर उपाययोजना करण्याचा प्रयत्न या संशोधनाच्या माध्यमातून केला आहे. प्रत्यक्षात रेशनधान्य दुकानदारांना कमिशन कमी मिळते. त्यामुळे धान्याची फेरफार होते असे काहींचे म्हणणे आहे. कमिशन किंवा त्यांना मिळणारा निव्वळ नफा या बाबींचाही अभ्यास केला आहे.

फक्त धान्याच्या उत्पादनात वाढ करुन उपयोग नाही. धान्य सर्वसामान्यांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. सर्वसामान्यांचे पोट भरल्यानंतर ते मनापासून देशसेवेत सहभागी होवू शकतात सामान्य व्यक्ती ह्या अर्थव्यवस्थेच्या कणा असतात. त्याला पुरेसे अन्न मिळाले तर मिळालेल्या कामात ती व्यक्ती जीव ओतून काम करते. अन्न–धान्याचे उत्पादन कितीही वाढले तरी उत्पादित धान्य हे प्रत्येकापर्यंत पोहोचविणारी वितरण विक्री व्यवस्था कार्यक्षम असायला पाहिजे. सार्वजनिक वितरण प्रणालीत अधिकारी व कर्मचारी यांचा अंमलबजावणीचा हेतू सकारात्मक असावा. सर्वांना केवळ कर्तव्यभावनेतूनच नाही तर सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रहीत जपण्याच्या भावनेतून या योजनेत काम करण्यास प्रोत्साहन मिळायला पाहिजे.

धान्य वितरणाची नोंद पारदर्शक असायला पाहिजे. एखाद्या लाभार्थ्याला अडचण असेल किंवा धान्य वाटपात आक्षेप असेल तर कोणाकडे तक्रार द्यावी या बाबींची जाणीव या विषयातून लोकांना करुन देता येईल. सामान्य लोक जागरुक झाले तर सार्वजनिक वितरण प्रणालीत पारदर्शकता आणता येईल. धान्याची गळती रोखून न्याय वितरणाला प्राधान्य दिले तर जनतेचा जीवनमाणाचा दर्जा सुधारुन वितरण व्यवस्थेचे ध्येय सफल होईल यासाठी हा विषय महत्त्वाचा आहे.

भारतात उपाशी आणि अर्धपोटी राहणाऱ्यांची व धान्य खरेदी करण्याची क्षमता नाही म्हणून एकवेळ निव्वळ पाणी घेवून झोपणाऱ्यांची संख्या खूप आहे. भारतातील दोन तृतीयांश जनता आजही दारिद्र्य रेषेच्या आसपास आहे.[४] त्यांच्या एकूण मासिक खर्चात अन्न–धान्यावर होत असलेल्या खर्चाचा मोठा वाटा

असतो. अन्नसुरक्षा कायद्यामुळे त्यांना आपल्या उत्पन्नाचा काही भाग पोषक आहारावर खर्च करता येईल. अन्नाच्या मूलभूत गरजेसाठी खर्च होणाऱ्या पैशांची बचत होवून तो पैसा आरोग्य व शिक्षण अशा मूलभूत बाबींसाठी खर्च करणे आवश्यक आहे. हा शासनाचा हेतू सफल होतो किंवा नाही याबाबतचे मूल्यमापन करण्यासाठी या योजनेचा अभ्यास प्रस्तूत संशोधनाच्या माध्यमातून केला आहे.

शासनाचा सार्वजनिक वितरण योजना अंमलबजावणीचा हेतू चांगला आहे. परंतु योजना अंमलबजावणीत स्तरावर लाभार्थ्यांना अनेक अडचणी येत आहेत. सार्वजनिक वितरण योजनेतील लाभार्थ्यांच्या पायाभूत समस्यांचा आढावा घेवून त्या समस्यांवर उपाय सूचवण्यासाठी प्रस्तूत संशोधन विषय महत्त्वाचा आहे.

त्याचबरोबर प्रस्तुत अभ्यासामुळे सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेची वस्तुस्थिती समोर येणार आहे. या वस्तुनिष्ट निष्कर्षाचा उपयोग शासनाला धोरण ठरविताना आणि विकास योजना आखताना होणार आहे. त्याचबरोबर प्रस्तुत अभ्यासातून समोर आलेल्या वस्तुनिष्ट निष्कर्षातून या योजनेचे यश–अपयश अर्थात मुल्यमापन पुढे येणार आहे तसेच योजनेच्या अंमलबजावणीतील अडचणी स्पष्ट होणार आहेत. या अडचणीच्या सोडवणूकीसाठीही प्रस्तुत अभ्यास उपयोगाचा ठरणार आहे.

### ३.४ संशोधन विषयातील परिभाषिक संज्ञा :

➢ **सार्वजनिक वितरण प्रणाली** :

दुसऱ्या महायुध्दामध्ये अनेक देश युध्दाच्या तडाख्यात सापडले त्यामुळे जनजीवन संपूर्ण विस्कळीत झाले लोकांची उत्पन्नाची साधने नष्ट झाली. शेतीतून धान्याचे उत्पादन पुरेसे न झाल्यामुळे अनेक देशांमध्ये उपासमार वाढली. भारत एक देशातही उपासमारीचे संकट आले होते. उपासमारीच्या काळात लोकांना सरकारकडून सवलतीच्या दरात धान्य उपलब्ध व्हावे यासाठी सरकारने जी स्वस्तधान्य योजना राबवली या योजनेलाच सार्वजनिक वितरण प्रणाली योजना म्हणून संबोधले आहे.

➢ सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेत लाभार्थी, शिधापत्रिकांचे प्रकार, धान्याचा दर्जा, धान्यांचे गोदाम, बचत गट, लाभार्थ्यांची आर्थिक परिस्थिती, बायोमेट्रिक पध्दती, लोकप्रतिनिधींची भुमिका,

पुरवठाधारक, दक्षता समित्या, स्थानिक राजकारण इ. महत्त्वाचे घटक आहेत. या घटकांचा सविस्तर आढावा घेवून सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील समस्यांचा सखोल आणि डोळसपणे अभ्यास करणे या अर्थाने चिकित्सक हा शब्द घेतला आहे.

### ३.५ संशोधनाचे क्षेत्र

➢ **पुणे जिल्हा:** अनेक गावे, वस्त्या, आणि शहरे असा भाग मिळून तालुका तयार होतो व अनेक तालुके मिळून जिल्हा तयार होत असतो. पुणे जिल्हा महाराष्ट्राच्या पश्चिमेला असून एकूण ५ जिल्ह्यांच्या सीमा या जिल्ह्याच्या लगत आहेत. एकूण १३ तालुक्यांचा मिळून पुणे जिल्हा तयार झाला आहे.

➢**बारामती व इंदापूर तालूका** : पुणे जिल्हयातील १४ तालुक्यांपैकी बारामती व इंदापूर हे दोन महत्त्वाचे तालुके आहेत. पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापुर तालुक्याची निवड अध्ययन क्षेत्र म्हणून केली आहे. पुणे जिल्ह्यात एकूण पाच प्रशासकिय विभाग आहेत. यामध्ये पुणे,भोर, मावळ, खेड व बारामती विभागाचा समावेश होतो. त्यापैकी बारामती प्रशासकिय विभागाची निवड संशोधन क्षेत्र म्हणून केली आहे. पुणे जिल्ह्यातील पाच प्रशासकिय विभागांपैकी बारामती विभागात एकुण ग्रामीण लोकसंख्या, शिधापत्रिकाधारक व रेशन दुकानांची संख्या, दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्या जास्त आहे. पुणे जिल्ह्याची एकूण ग्रामीण लोकसंख्या ३६८७२४३ एवढी आहे.[५] प्रशासकिय विभागानुसार आकडेवारी खालीलप्रमाणे.

**तक्ता क्र.** १

**विभागवार ग्रामीण लोकसंख्या तपशिल**

| विभागाचे नांव | विभागावर एकुण ग्रामीण लोकसंख्या | एकुण ग्रामीण लोकसंख्या% वारी |
|---|---|---|
| पुणे विभाग | ६४२६३६ | १७.४२% |
| भोर विभाग | ४००३९८ | १०.८५% |
| मावळ विभाग | ६९२१७५ | १८.७७% |
| खेड विभाग | ९१२०२४ | २४.७३% |
| बारामती विभाग | १०४००१० | २८.२०% |

पुणे जिल्ह्यातील एकूण ग्रामीण लोकसंख्येपैकी सर्वांत जास्त लोकसंख्या बारामती विभागात आहे. बारामती विभागात सर्वात जास्त ग्रामीण लोकसंख्या बारामती व इंदापूर तालुक्यात आहे.

पुणे जिल्ह्यातील बारामती विभागात बारामती व इंदापूर तालुक्यात रेशन कार्डधारक व स्वस्त धान्य दुकानांची संख्या जास्त आहे. या पार्श्वभुमीवर शिधापत्रिका व रेशनधान्य दुकानांची संख्या दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे.

**तक्ता क्र.** २

**शिधापत्रिका व रेशन धान्य दुकानांची तपशील**

| अ. क्र. | तालुका | रेशन धान्य दुकानांची संख्या | रेशनकार्ड धाराकांची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | अंत्योदय | बी.पी.एल. | ए.पी.एल |
| १ | जुन्नर | १४५ | ५५०४ | १५६२२ | ४८९५५ |
| २ | आंबेगांव | १०८ | ५०७४ | १६३०४ | २६९९६ |
| ३ | शिरुर | १३० | ४३८६ | ९६१६ | ५३५९३ |
| ४ | खेड | १८० | ३६६९ | १५४५३ | ५०४६७ |
| ५ | मावळ | १६१ | २०३४ | ५१३० | ६९१४३ |
| ६ | मुळशी | ७८ | ५३५ | १४४० | ३०४९९ |
| ७ | हवेली | १४५ | २८८६ | ५५६४ | १०६३८४ |
| ८ | दौंड | १४१ | ७०७२ | ७२५३ | ४८४९८ |
| ९ | पुरंदर | ९४ | ५७२१ | ८१५६ | ३६४९८ |
| १० | वेल्हे | ३८ | ६३९ | २५३४ | ७८९४ |
| ११ | भोर | १४१ | २४७० | ८५९१ | २७९४६ |


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२ | बारामती | २१९ | ९४६५ | १६०९४ | ७५७३८ |
| १३ | इंदापुर | १७३ | ६३३५ | १६१२३ | ५६२४४ |

संदर्भ :– जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन,२०१४, पुणे

पुणे जिल्ह्यातील बारामती विभागात बारामती व इंदापूर तालुक्यात रेशन कार्डधारक व स्वस्तधान्य दुकानांची संख्या जास्त आहे. ते दर्शविणारा आलेख खालीलप्रमाणे.

आलेख क्र.१

रेशन कार्डधारक व स्वस्त धान्य दुकानांची संख्या दर्शविणारा आलेख




वरील आकडेवारीवरून असे स्पष्ट होते की, पुणे जिल्हयातील प्रशासकिय विभागामध्ये बारामती विभागात सर्वात जास्त रेशनकार्डधारक आहेत. त्याचबरोबर स्वस्तधान्य दुकानांची संख्याही सर्वात जास्त आहे. बारामती विभागात बारामती व इंदापूर तालुक्यात रेशनकार्डधारक व स्वस्तधान्य दुकानांची संख्या जास्त आहे. या पार्श्वभुमीवर अभ्यास क्षेत्र म्हणून पुणे जिल्हयातील प्रशासकिय विभागामध्ये बारामती विभाग आणि बारामती विभागातील इंदापूर आणि बारामती या दोन तालुक्यांची निवड केली आहे.

दुसऱ्या बाजुला पुणे जिल्हयाच्या प्रशासकिय विभागामध्ये बारामती विभाग आणि बारामती विभागातील दौंड, इंदापूर आणि बारामती तीन तालुक्यांमध्ये दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची संख्या सर्वाधिक आहे. या कारणामुळेही बारामती विभागातील इंदापूर आणि बारामती या दोन तालुक्यांची अभ्यास क्षेत्र म्हणून निवड केली आहे.

या पार्श्वमुमीवर पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील कुटुंबे व दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची संख्या दर्शवणारा तक्ता खालीलप्रमाणे आहे.[७]

**तक्ता क्र.** ३

**पुणे जिल्ह्यातील ग्रामीण व दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची संख्या**

| अं.क्र. | विभागाचे नांव | ग्रामीण कुटुंबाची संख्या | दारिद्र्यरेषेखालील ग्रामीण कुटुंबांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | पुणे विभाग | ६८४२३ | १३३७५ |
| २ | भोर विभाग | ८४२९७ | १६१६१ |
| ३ | मावळ विभाग | १०४८९६ | २०७६४ |
| ४ | खेड विभाग | १६९५३४ | ३३१३८ |
| ५ | बारामती विभाग | २००२७३ | २००२७३ |
| ५.१ | बारामती | ७५२२५ | |
| ५.२ | इंदापुर | ६७६३३ | |
| ५.३ | दौंड | ५७४१५ | |

पुणे जिल्हयातील १२०१३२ एवढी दारिद्र्यरेषेखालील कुटुंब आहेत. पुणे जिल्हयातील पाच प्रशासकिय विभागापैकी सर्वात जास्त दारिद्र्यरेषेखालील कुटुंब (३६६९४) बारामती विभागात आहेत.

वरील आकडेवारीवरुन असे लक्षात येते की, पुणे जिल्हयातील बारामती विभागात ग्रामीण लोकसंख्या जास्त आहे. त्याच बरोबर बारामती विभागात शिधापत्रिकाधारकांची व रेशनधान्य दुकानदारांची संख्या जास्त आहे. दुसरीकडे बारामती विभागात दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्या सुध्दा जास्त आहे. या पार्श्वभूमीवर बारामती विभागाची निवड अभ्यासक्षेत्र म्हणून केली आहे. त्याचबरोबर बारामती विभागातील इंदापूर आणि बारामती या सर्वाधिक जास्त लोकसंख्या असलेल्या तालुक्यांची अभ्यासासाठी निवड केली आहे.

**३.६ संशोधनाची उद्दिष्टे** :

सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण व्यवस्था ही सामान्य माणसासाठी महत्त्वाची योजना आहे. दुर्बल घटकांचा अन्न–धान्याची गरज भागवण्यासाठी अस्तित्वात आली आहे. अत्यल्प किंमतीमध्ये गरीबांना जगण्यासाठी आवश्यक असलेले अन्न–धान्य उपलब्ध करून देण्याचा हा एक महत्वाचा उपक्रम आहे. परंतु हा उपक्रम लालफितीच्या दुष्टचक्रात आडकला असून दुकानदार आणि राजकारणी यांच्या संगनमताने त्याच्या मुळ उद्दिष्टापासून बाजुला गेल्याचा भास होत आहे. या पार्श्वभूमीवर या योजनेचे वस्तुनिष्ट मुल्यमापन व अभ्यास होणे आवश्यक आहे. अशा या महत्वपूर्ण विषयाच्या समाजशास्त्रीय संशोधनात्मक अभ्यासासाठी पुढील उद्दिष्टे निर्धारीत केली आहेत.

१.सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेच्या उदिष्टांचा आढावा घेऊन तिच्या अंमलबजावणीचे स्वरुप समजून घेणे.

२. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतून वितरीत होत असलेल्या अन्न–धान्याच्या स्वरूप व दर्जा यांचा आढावा घेणे.

३.सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना अंमलबजावणीच्या सुसुत्रीकरणात स्थानिक राजकारणी लोक, दक्षता समिती, महिला बचत गट यांच्या भूमिकांचा अभ्यास करणे.

४.सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील रेशनधान्य दुकानदारांच्या भूमिकांचा अभ्यास करणे.

५.समाजातील गरजु लोकांना अन्नसुरक्षा मिळवून देण्यात सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना यशस्वितेची चिकित्सा करणे.

६.सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना कार्यक्षम होण्यासाठी या योजनेतील अडचणींवर उपाय सुचवणे.

अशा प्रकारची महत्वाची उद्दिष्टे समोर ठेऊन सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेचा समाजशास्त्रीय चौकटीत अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

### ३.७ संशोधनाची गृहितके :

सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण व्यवस्था गरीब व आर्थिकदृष्ट्या कमकुवत गटाची अन्न–धान्याची गरज भागवणारी महत्त्वाची योजना आहे. अत्यल्प किमतीमध्ये आवश्यक असलेले अन्न–धान्य उपलब्ध

करून सामाजिक सुरक्षीतता जपण्याचा प्रयत्न या योजनेच्या मार्फत केला जातो. तथापि ही योजना राबविताना अनेकविध समस्यांचा सामना करावा लागतो. विशेषत: अंमलबजावणीच्या पातळीवर अनेक अव्हानांचा अडथळे येत आहेत. दुसरीकडे प्रशासकीय लालफितीच्या दुष्टचक्रात अडकली असून तिच्या मुळ उद्दिष्टापासून बाजुला जाते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण व्यवस्थेचा संशोधनात्मक अभ्यास करणासाठी पुढील गृहितके निर्धारीत केली आहेत.

१. सार्वजनिक वितरण प्रणाली महाराष्ट्राच्या ग्रामीण आणि शहरी भागातील गरीब व आर्थिकदृष्ट्या मागास घटकांची अन्न–धान्य विषयक किमान गरज भागविण्यासाठी उपयुक्त ठरत असलेली अत्यंत महत्वाची योजना आहे.
२. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतून अपुरा व निकृष्ट दर्जाच्या अन्न–धान्याचा पुरवठा केला जातो.
३. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण व्यवस्थेचे कामकाज दप्तर दिरंगाई, लालफितीच्या कारभामुळे प्रभावीत झाले असून दुकानदारांच्या मनमानी कारभार, अपारदर्शक व्यवहार आणि अनियमिततेच्या दुष्टचक्रात आडकली आहे.
४. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेच्या अंमलबजावणीच्या सुसूत्रीकरणात आणि नियंत्रणाच्या यंत्रणेचे राजकीयकरण झाले असून योजनेच्या अंमलबजावणीत राजकिय लोकांचा हस्तक्षेप वाढला आहे.

वरील गृहितकांची सत्यता शोधण्यासाठी संशोधकाने वर्णनात्मक आराखडयाचा उपयोग केला आहे.

### ३.८ **संशोधनाची पध्दती :**

प्रस्तुत संशोधन कार्यात वर्णनात्मक व निदानात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे. पुणे जिल्हयातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेचा चिकित्सक अभ्यास विशेष: संदर्भ बारामती व इंदापूर तालुका या संशोधन विषयाच्या सुत्रबध्द मांडणीसाठी ही संशोधन पध्दती उपयुक्त आहे. गुणात्मक

माहितीच्या आधारे आशय विश्लेषण केले आहे. तर संख्यात्मक माहितीच्या आधारे सांख्यिकीय विश्लेषण केले आहे. त्यासाठी सांख्यिकीय मध्यांक व टक्केवारीच्या माध्यमातून वस्तुनिष्ट आलेखन आणि विश्लेषण केले आहे.

**३.९ नमुना निवड :**

पुणे जिल्ह्यातील बारामती विभागातील बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील लाभार्थी हे संशोधन विषयातील महत्त्वाचे समग्र किंवा विश्व आहे. बारामती व इंदापूर तालुक्यातील गावांची निवड संभाव्य नमुना निवड पध्दतीतील साधा यादृच्छिक पध्दतीचा वापर करुन त्यातील लॉटरी पध्दतीने केली आहे.

लॉटरी पध्दतीने बारामती व इंदापूर तालुक्यातील १०० गावांची निवड केली. निवडलेल्या गावातील १०० रेशनधान्य दुकानदारांची निवड मुलाखतीसाठी केली. एका गावात दोन किंवा दोनपेक्षा जास्त रेशनधान्य दुकानदार असतील तर जास्त लाभार्थी असलेल्या दुकानदाराची निवड मुलाखतीसाठी केली आहे. रेशनधान्य दुकानदारांकडे असलेल्या लाभार्थ्यांच्या याद्यांमधून लॉटरी पध्दतीने मुलाखतकर्ते निवडले आहेत.[८]

गावांची लॉटरी पध्दतीने निवड करताना बारामती व इंदापूर तालुक्यातील प्रत्येक गावाची चिठठी तयार केली. गावांची नावे लिहिलेल्या चिठया एका टोपलीत टाकल्या. व्यवस्थित मिसळून बाजूना एका पानावर गावांची यादी तयार ठेवली. एक एक चिठठी काढून ज्या गावाचे नाव निघेल त्या गावाच्या नावापुढे खुण केली. लॉटरी तंत्राचा वापर करताना Law of Replacement या तत्वाचा उपयोग केला.[९] यादीत गावाच्या नावासमोर खुण केल्यानंतर त्या चिठठीवर विशिष्ट खुण करुन ती चिठठी पुन्हा टोपलीत टाकली त्यामुळे प्रत्येक गावाला निवडून येण्याची समान संधी मिळाली. बारामती तालुक्यातील ११६ खेडेगावांपैकी ५० खेडेगाव व इंदापूर तालुक्यातील १४३ खेडेगावांपैकी ५० खेडेगावांची निवड लॉटरी पध्दतीने निवड केली आहे.

**तक्ता क्र. ४**

**उत्तरदात्यांची / मुलाखतकर्त्यांची संख्या दर्शवणारा तक्ता**

| तालुका | गावांची संख्या | एकूण निवडलेली गावे | मुलाखतीसाठी प्रत्येक गावातून निवडलेल्या रेशनधान्य दुकानदारांची संख्या | प्रत्येक गावातून निवडलेल्या लाभार्थ्यांची संख्या | एकूण लाभार्थांची संख्या | मुलाखतीसाठी दोन्ही तालुक्यातुन निवडलेले एकूण लाभार्थी |
|---|---|---|---|---|---|---|
| बारामती | ११६ | ५० | ५० | ४ | २०० | ४०० |
| इंदापुर | १४३ | ५० | ५० | ४ | २०० | |

**मुलाखतीसाठी निवडलेल्या पुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांचा तपशील खालीलप्रमाणे.**

- बारामती तालुका पुरवठा अधिकारी १
- इंदापूर तालुका पुरवठा अधिकारी १

### ३.१० तथ्य संकलनाची साधने

प्रस्तूत संशोधन विषयाचे तथ्य संकलन करताना प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा उपयोग केला. संशोधनातील तथ्य हे संख्यात्मक व गुणात्मक आहेत.

प्राथमिक साधने : १.अवलोकन २. मुलाखत ३. प्रश्नावली यापैकी प्रश्नावली आणि मुलाखत अनुसुची या साधनाचा तथ्य संकलनासाठी वापर केला आहे.

- **दुय्यम साधने** ➢

सार्वजनिक प्रलेख

| प्रकाशित प्रलेखे व अन्य स्त्रोत | अप्रकाशित प्रलेखे |
|---|---|
| १. जिल्हा व तहसिल कार्यालयातील अहवाल | १. शासकिय रेकॉर्ड |
| २. महाराष्ट्र व पुणे जिल्ह्याची सामाजिक व आर्थिक पहाणी | २. संशोधन अहवाल |
| ३. विविध ग्रंथालयीन पुस्तके | |
| ४. वर्तमानपत्रे | |
| ५. मासिके | |

### ३.११ चल व उपचल पदे

**चल**– पारदर्शकता, अंमलबजावणी, लाभार्थी, आर्थिक परिस्थिती, कुपोषण रेशनकार्डचे प्रकार, धान्याचा दर्जा, अंमलबजावणी, इ.

**उपचल** – कौटुंबिक उत्पन्न, एकूण खर्च, बचत, कर्ज इ.१०

### ३.१२ तथ्य विश्लेषण व तथ्य प्रक्रियन

प्रस्तूत संशोधन विषयात लाभार्थ्यांच्या मुलाखतीच्या आधारे संकलित केलेल्या तथ्याचे वर्गीकरण व विश्लेषण केले आहे. लाभार्थ्यांच्या ४००, रेशनधान्य दुकानदारांच्या १०० व पुरवठा विभागातील २ अधिकाऱ्यांच्या मुलाखती घेतल्या. मुलाखतीमधील माहिती, स्वस्तधान्य दुकानांचे व धान्यसाठा असलेल्या गोदामांचे निरिक्षण, गावातील ग्रामस्थांबरोबर औपचारिक गप्पांतून मिळालेली माहिती, स्वस्तधान्य दुकानदारांच्या नोंदवहया, शासकिय अहवाल, वर्तमानपत्रातील बातम्या, तहसिल कार्यालयातील पुरवठा विभागातील धान्य वितरणाचे अहवाल, या सर्व तथ्यांच्या माध्यमातून उपलब्ध झालेल्या माहितीचे व आकडेवारीचे सारणीकरण करुन विश्लेषण करण्यात आले.

प्रस्तुत संशोधन विषयाचे तथ्य प्रक्रियन करताना काही ठिकाणी हस्तसारणीचा उपयोग केला आहे. तथ्य प्रक्रियेसाठी काही ठिकाणी संगणकाचा वापर करण्यात आला आहे. त्याचबरोबर टक्केवारीच्या माध्यमातून वस्तूस्थिती दर्शवली आहे.

तथ्य प्रक्रियन करताना सर्व अनुसूचींचे प्रथम क्रमाने संकलन करुन आवश्यक असलेल्या सर्व मुददयांची माहिती क्रमवार जुळवली. त्यानंतर उत्तरांचे वर्गीकरण करण्यात आले. वर्गीकरणाचे कार्य झाल्यानंतर त्या माहितीचे संकेतीकरण करुन संकेत पुस्तिका तयार करण्या आली. शेवटी मास्टर चार्ट तयार करण्यात आला त्या मास्टरचार्टच्या आधारे माहितीचे विश्लेषण करण्यात आले. त्याआधारे गृहितकांची पडताळणी करण्यात आली. संशोधनातील निष्कर्ष काढून योग्य शिफारशी सुचवण्यात आल्या.

## ३.१३ संशोधन अध्ययनाची व्याप्ती

१. **भौगोलिक व्याप्ती** :

संदर्भित संशोधन कार्य पुणे जिल्ह्यातील बारामती व इंदापूर तालुक्यातील लॉटरी पध्दतीने निवडलेल्या गावातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेशी संबंधित आहे.

२. **जनसंख्या व्याप्ती** :

संशोधन विषयात सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील लाभार्थी, स्वस्तधान्य दुकानदार, प्रशासकिय लोक, विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामपंचाय पदाधिकारी, बचत गट हे मुख्य घटक आहेत. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील ग्रामीण भागातील सर्व प्रकारच्या शिधापत्रिका लाभार्थ्यांच्या समस्यांचा चिकित्सक अभ्यास प्रस्तूत संशोधन विषयातून करण्यात केला आहे. सदरचा संशोधन विषय सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेतील ग्रामीण शिधापत्रिकाधारक व रेशनधान्य दुकानदारांशी संबंधित आहे.

३. कालमर्यादा : प्रस्तुत अभ्यासासाठीचा कालावधी २००५ ते २०१४ या १० वर्षाचा निर्धारीत केला आहे.

## ३.१४ संशोधनाच्या मर्यादा

१. प्रस्तुत अभ्यासासाठीचा कालावधी २००५ ते २०१४ या  १० वर्षाचा निर्धारीत केला आहे.
२. प्रस्तुत अभ्यासातून समोर आलेले निष्कर्ष मर्यादीत स्वरूपात उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे काढलेले असल्यामुळे त्याची सत्यता स्थळ काल परिस्थितीनुसार बदलणार आहे. त्यामुळे प्रस्तुत अभ्यासातून समोर आलेले निष्कर्ष इतर ठिकाणी लागू पडतीलच असे नाही.

३. मुलाखत घेताना काही लोक निरक्षर असल्यामुळे योग्य अपेक्षित माहिती मिळवण्यासाठी त्रास झाला. काही मुद्यांची माहिती अपूर्ण मिळाल्यामुळे माहिती संकलनात अडचणी निर्माण झाल्या.
४. धान्याचा लाभ मिळणाऱ्या सर्वच लाभार्थी लोकांची भेट न झाल्यामुळे माहिती संकलनात अडचण निर्माण झाली. काही ठिकाणी कुटुंबप्रमुख सोडून इतरांनी माहिती सांगितली.
५. बारामती व इंदापूर पुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांनी व रेशनधान्य दुकानदार यांनी माहिती सांगण्यासाठी टाळाटाळ केली.
६. पुरवठा विभागतील माहिती जमवण्यासाठी माहितीच्या अधिकाराचा वापर करावा लागला. त्यामुळे माहिती संकलनासाठी वेळ लागला.

**३.१५ प्रकरणांची योजना**

प्रस्तूत संशोधन विषयाची विभागणी एकुण पाच प्रकरणात करण्यात आली आहे.

**प्रकरण १. प्रस्तावना**

प्रकरण एकमध्ये संशोधन विषयाची प्रस्तावना केली आहे. प्रकरणात लोककल्याणकारी योजना आणि सामाजिक न्याय, रॉल्सचा वितरणात्मक न्याय व सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना, अन्नाचा अधिकार व जग, भारतीय राज्यघटना, लोककल्याणकारी तरतुदी व अन्नसुरक्षितता, अन्नाचा अधिकार आणि भारताचे सर्वोच्च न्यायालय, भारतातील, अन्नसमस्येचे स्वरुप व योजलेले उपाय, संशोधन विषयाची सैधान्तिक पार्श्वभूमी, सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेचे स्वरुप, सार्वजनिक, स्वस्तधान्य वितरण योजनेची वस्तुस्थिती व संशोधन प्रश्न, सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजना व राजकिय धोरण या सर्व घटकांचे विश्लेषण करण्यात आले आहे.

**प्रकरण २. संबंधित साहित्य व गतसंशोधनाचा आढावा**

संबंधित संदर्भ साहित्याच्या आढाव्याची गरज, संबंधित साहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व, संबंधित साहित्याचा आढावा, संबंधित साहित्याचा आढाव्याचे फायदे, गत संशोधनाच्या आढाव्याची गरज, गत संशोधनाचा आढावा, समारोप या सर्व घटकांचा समावेश प्रकरण दोन मध्ये करण्यात आला आहे.

**प्रकरण ३. संशोधन कार्यपध्दती**

प्रस्तावना, समस्याविधान, संशोधन विषयाचे महत्त्व, संशोधनाचे प्रश्न, संशोधनाची उदिष्टये, संशोधनाची गृहितके, संशोधनाचे क्षेत्र, नमुना निवड, तथ्य संकलनाची साधने, संशोधनाची पध्दती, संशोधनाची चले, संशोधन आराखडा, तथ्य प्रक्रियन, संशोधनाच्या अडचणी, संशोधन अध्ययनाची व्याप्ती या सर्व मुद्यांचे विश्लेषण क्रमवार प्रकरण तीन मध्ये करण्यात आले आहे.

**प्रकरण ४. तथ्य विश्लेषण व सारणीकरण**

(बारामती व इंदापूर तालुक्यातील सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण व्यवस्था) माहितीचे संकलन या प्रकरणात करण्यात आले आहे. लाभार्थी रेशनधान्य दुकानदार व पुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांच्या मुलाखतींचे विश्लेषण या प्रकरणात करण्यात आले आहे.

**प्रकरण ५. सारांश, निष्कर्ष व उपाययोजना**

संशोधन विषयाचा सारांश, माहितीचे संकलन करुन संशोधन विषयातून निघालेले निष्कर्ष या प्रकरणात नोंदवले आहेत. संशोधन विषयातील गृहितकांची पडताळणी केली आहे. सार्वजनिक स्वस्तधान्य वितरण योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शिफारशी या प्रकरणात सुचवण्यात आल्या आहेत.

**संदर्भ :**

१. http://blogs.worldbank.org

२. U.S. Department of Agriculture, New Delhi, India, Indian Cabinet Approves National Food Security Bill 2013, GAIN Report IN3037, 11 April 2013

३. अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन डिसेंबर, २०१४

४. "India – New Global Poverty Estimates". World Bank

५. http://www.census2011.co.in/census/district/359-pune.html

६. http://mahades.maharashtra.gov.in

७. आधार प्रकल्प अधिकारी, ग्रामीण विकास यंत्रणा पुणे,

८. प्रा. सुरेश स. मेश्राम, सामाजिक संशोधन पध्दती, कृष्णचंद्र एजन्सी, नागपूर, पान. २४

९. प्रा. सुरेश स. मेश्राम, सामाजिक संशोधन पध्दती, कृष्णचंद्र एजन्सी, नागपूर, पान.१८

१०. प्रा. सुरेश स. मेश्राम, सामाजिक संशोधन पध्दती, कृष्णचंद्र एजन्सी,नागपूर, पान. ७६